|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

A' Grade

'(NAAC Re-Accredited )

3rd Cycle

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९,२५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

---

**बातमी क्र.१**

जळगाव दि. ७ ( प्रतिनिधी) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा सव्वीसावा दीक्षांत समारंभ दि.२७ फेब्रुवारी, २०१८ रोजी होत असून या समारंभासाठी अमेरिकेत स्थायिक झालेले अनिवासी भारतीय सुप्रसिध्द वैज्ञानिक व उद्योजक डॉ.अशोक जोशी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार, दि.७ फेब्रुवारी रोजी दीक्षांत समारंभाच्या पूर्व तयारीची बैठक झाली. या बैठकीत प्रमुख अतिथी म्हणून डॉ.अशोक जोशी यांना निमंत्रित करण्यात आले असल्याची माहिती कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी दिली. २७ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता दीक्षांत समारंभ आयोजित करण्यात आला आहे.

डॉ.अशोक जोशी हे अमेरिकेच्या वैज्ञानिक आणि उद्योजक क्षेत्रातील मोठे नाव आहे. १९६६ मध्ये पुणे येथील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग येथून अभियांत्रिकीची पदवी घेतलेल्या अशोक जोशी यांनी १९७० मध्ये अमेरिकेच्या नॉर्थ वेस्टर्न विद्यापीठातून एम.एस. आणि १९७२ मध्ये पीएच.डी पदवी प्राप्त केली. १९७३ मध्ये पेन्सेलव्हेनिया विद्यापीठातून ते पोस्ट डॉक्टरल झाले. अमेरिकेतील मान्यताप्राप्त संशोधक आणि उच्च तंत्रज्ञानातील उद्योजक अशी त्यांची ओळख आहे. ऊर्जा, पर्यावरण, जैवतंत्रज्ञान या क्षेत्रात त्यांनी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित केलेले असून १०० पेक्षा अधिक अमेरिकन पेटंट त्यांच्या नावावर आहेत. याशिवाय ४० अमेरिकन पेटंट फाईल करण्यात आलेले आहेत. डॉ.जोशी यांनी चार व्यावसायिक उत्पादने सुरु केली. याशिवाय त्यांनी सहा कंपन्या सुरु केल्या. त्यातील तीन कंपन्यांची विक्री केली आणि अन्य तीन कंपन्यामध्ये सक्रीय सहभाग आहे. अमेरिकेतील अत्यंत प्रतिष्ठेचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. भारतात त्यांनी तीन शाळा सुरु केलेल्या असून दोन हजारापेक्षा अधिक वंचित मुले त्यामध्ये शिक्षण घेतात. त्यापैकी एक शाळा विकलांग मुलांसाठी सुरु करण्यात आलेली आहे. भारतातील अनेक सामाजिक उपक्रमात त्यांचा सहभाग आहे.

----------------------------------------------------------------------------------------------------

**बातमी क्र.२**

जळगाव दि.७ (प्रतिनिधी):- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा विद्यापीठस्तरीय युवक महोत्सव दि.१२ व १३ फेब्रुवारी रोजी विद्यापीठ परिसरात आयोजित करण्यात आला आहे.

विद्यापीठाने या वर्षापासून प्रथमच जिल्हास्तरीय युवक महोत्सवाचे आयोजन केले. दि. २७ ते ३१ जानेवारी या कालावधीत जिल्हास्तरावरील युवक महोत्सवाचे आयोजन भुसावळ येथील नाहाटा महाविद्यालय, प्रताप महाविद्यालय, अमळनेर, पूज्य साने गुरुजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शहादा आणि एस.एस.व्ही.पी.एसचे कला व वाणिज्य महाविद्यालय, धुळे येथे केले होते. या जिल्हास्तरीय महोत्सवात विविध २५ उपकलाप्रकारात प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केलेल्या विजेत्यांचा विद्यापीठस्तरीय युवक महोत्सव १२ व १३ फेब्रुवारी रोजी विद्यापीठात होणार आहे.

या महोत्सवात ८९३ विद्यार्थी कलावंत तसेच संघ व्यवस्थापक सहभागी होत आहेत. या महोत्सवासाठी विद्यापीठात सहा रंगमंच तयार करण्यात आले आहेत. सोमवार, दि.१२ फेब्रुवारी रोजी सकाळी ८ वाजता या महोत्सवाचे उद्‌घाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर सकाळी ९ वाजता प्रत्यक्ष कलाप्रकारांना प्रारंभ होईल. दि. १३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

या महोत्सवाच्या पूर्व तयारीसाठी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व कार्याध्यक्ष तथा व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील यांच्या उपस्थितीत विविध समित्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत महोत्सव अत्यंत चांगल्या पध्दतीने करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

----------------------------------------------------------------------------------------------------

जा.क्र. उमवि/१६/हस्तदेय /२०१८ दि. ७ फेब्रुवारी, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या तीनही जिल्हयाच्या आवृत्तीत प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,<br>
स्वाक्षरीत प्रत/-<br>
(सुनील पाटील)<br>
जनसंपर्क अधिकारी